# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U/176 / 2009 /1 0 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect of Shri V.B.Joshi,**
**Vishwanath Electrical Co., Nageshwarwadi, Aurangabad**
**Aurangabad.(Consumer No. 490010194404)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri V.B.Joshi, Vishwanath Electrical Co., Nageshwarwadi, Aurangabad.**

**The consumer has requested the Forum to pass Interim order for reconnection of the supply.**

**The hearing on passing of Interim Order will be held on Tuesday 31st Jan.09 at 12.00 Hours.**

**You are requested to submit your reply at the time of hearing.**

**Encl: As above**

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
Shri V.B.Joshi,
**Vishwanath Electrical Co.,**
**Nageshwarwadi, Aurangabad.**

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM AURANGABAD ZONE, AURANGABAD**

**( Case No. CGRF / AZ /AUR /U / 176 / 2009 / 10 )**

Shri V.B.Joshi
**Wishwanath Electrical Co.**
**Nageshwarwadi, Aurangabad.**
( Consumer No. 490010194401)

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle,Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 31.01.2009**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed his grievance in the Forum regarding wrong bills issued by the Distribution Licensee and also requested the Forum to pass an interim order directing the Distribution Licensee not to disconnect electricity supply of his residence on account of wrong bills issued by the D.L..

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission The hearing on the application of the consumer for passing interim order was kept on 31.01.09.

On the date of hearing consumer was absent. Nodal officer's authorized representative was present. He stated that due to wrong reading taken by the meter reader incorrect bill was issued to the consumer. He further stated that he is ready to revise the bill of the consumer.

**Heard both parties,. Forum observed that D.L. has issued incorrect bills to the consumer. D.L. is hereby directed not to disconnect the electric supply of the consumer till final disposal of the grievance.**

**Next hearing in the matter is kept on 3.2.09.**

| | | |
|---|---|---|
| **( H.A.Kapadia)** | **( P.A.Sagane)** | **(V.A.Hambire)** |
| **Member** | **Member Secretary** | **Chairman** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७६/२००९/१०**

**तक्रार दाखल दिनांक :- २७/०१/२००९**
**निकाल दिनांक :- २४/०२/२००९**

**श्री व्ही.बी.जोशी,**
**विश्वनाथ इलेक्ट्रीकल कंपनी,**
**नागेश्वरवाडी,औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०१९४४०४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २७/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३१/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांनी महावितरण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे.मागिल गेल्या तीन चार महीन्यापासून त्यांना मीटरवरील रिडींग प्रमाणे वीज बिल आकारण्यात येत नसल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे त्यांनी तक्रार दाखल केली होती महावितरणच्या संबंधीत अधिका-याने केलेल्या स्थळपाहणीत मीटर वरील रिंडींग चुकीची घेतल्यामुळे वीज बिल चुकीचे आकारण्यात आले असे त्यांना सांगण्यात आले. अनेक वेळा प्रयत्न करूनही त्यांना योग्य बिल देण्यात आले नाही. त्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन सुधारीत बिल देण्याबाबत तसेच या युकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ३१/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार उपस्थित नव्हते महावितरण तर्फे नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री जरारे उपस्थित होते. त्यांनी मीटर रिडरने चुकीची मीटर रिडिंग घेतल्यामुळे अर्जदारास वाढीव वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले व मीटर प्रमाणे सुधारीत बिल देण्याची तयारी दर्शविली. मंचाने नोडल अधिकारी प्रतिनिधीस ग्राहकाचा वीज पुरवठा त्यांनी मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यत खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश दिला व सुधारीत वीज बिलचा प्रस्ताव पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे आदेश दिला. या प्रकरणाची पुढील सुनावणी ०७/०२/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ०७/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार उपस्थित नव्हते. नोडल अधिकारी यांनी सुधारीत बिल प्रस्ताव मंचात दाखल केला व पुढील वीज बिलात चुकीने वसुल करण्यात आलेल्या रक्कमेची क्रेडीट देण्यात येईल असे सांगितले.

४) अर्जदार व महावितरण चे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास वाणीज्य वापरासाठी (दुकानासाठी) वीज पुरवठा करण्यात आला असुन त्यांच्याकडे लावण्यात आलेल्या मीटर क्रमांक ७९२६३७ असा असुन त्यांना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००१०१९४४०४ असा आहे. जुन २००८ मध्ये मीटर वरील रिडींग ००५६८ अशी घेण्यात येवुन त्यांना जुलै २००८ व ऑगस्ट मध्ये १५० युनीट तर सप्टेंबर २००८ ते ऑक्टोबर २००८ या काळात ८४ युनीट वीज वापराचे सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले. महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २५/११/२००८ रोजी केलेल्या स्थळ पाहणी अहवालात मीटर वरील रिडींग ००४४६ अशी असल्याचे नोंद दिसुन येते यावरून जुन २००८ मध्ये घेण्यात आलेली ००५६८ ही रिडींग चुकीची असल्याचे स्पष्ट होते. अर्जदारने या चुकीच्या वीज बिलाबाबत दिनांक २१/१०/२००८ रोजी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे याबाबत तक्रार केली पण त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे दिसुन येते.नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सुधारीत वीज बिल प्रस्तावाची मंचाने निरिक्षण केल्यावर ते योग्य असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असुन ते नुकसान भरपाई मिळण्यात पात्र आहेत.

मंच या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)	महाविरण तर्फे अर्जदारास देण्यात येणा-या पुढील वीज बिलात ५०५-९५ रूपये चे क्रेडीट देवुन सुधारीत वीज बिल द्यावे.

२)	चुकीची रिडींग घेवुन अर्जदारास दिलेल्या मानसीक त्रासापोटी महावितरण कंपनीने १००/-रूपये नुकसान भरपाई तीस दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७६/२००९/१०** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री व्ही.बी.जोशी,**
**विश्वनाथ इलेक्ट्रीकल कंपनी,**
**नागेश्वरवाडी,औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७६/२००९/१० )

आपण दिनांक २७/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**